|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**संलग्नता विभाग**

**जा.क्र.कबचौउमवि/५/४९५/२०१८** **दिनांक: १७/०९/२०१८**

## <u>***कालमर्यादा***</u>

प्रति,

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या**
**सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य तसेच**
**मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक ......**

**विषय:- संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये शिकविल्या जाणा-या अभ्यासक्रमांची माहिती ऑनलाईन प्रणालीव्दारे भरणे किंवा अद्ययावत करणेबाबत......**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयान्वये कळविण्यांत येते की, विद्यापीठाच्या संलग्नता विभागामार्फत ऑनलाईन प्रणालीव्दारे सर्व संलग्नीत महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांचेकडून महाविद्यालयांत/परिसंस्थेत शिकविल्या जाणा-या संबंधित अभ्यासक्रमांची माहिती मागील शैक्षणिक वर्षात अद्ययावत करण्यांत आलेली आहे.

आता संलग्नता विभागातर्फे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता नवीन विषय/ अभ्यासक्रम/नवीन विद्याशाखा/अतिरिक्त तुकडी/विद्यार्थी संख्या वाढ/सेकंड शिफ्ट इत्यादि बाबींचे विस्ताराचे तसेच संलग्नीकरणाचे नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार, कायम संलग्नीकरण इत्यादिंचे प्रस्ताव शासनाकडील अंतिम निर्देशान्वये स्विकारण्यांत येणार असून त्यादृष्टीने <u>संलग्नीत महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थेत शिकविले जाणारे अभ्यासक्रम, अभ्यासक्रमनिहाय विषय, तुकड्या तसेच महाविद्यालयाशी संबंधीत इतर माहिती भरणेसाठी किंवा यापूर्वी भरण्यांत आलेली माहिती अचूक अद्ययावत करणेसाठी ऑनलाईन प्रणालीमध्ये आवश्यक त्या links</u> तयार करण्यांत आल्या आहेत.

सदर लिंकमधील माहिती भरणेसाठी किंवा भरलेली माहिती अद्ययावत करणेसाठी विद्यापीठाच्या **<u>www.nmu.ac.in</u>** या संकेतस्थळावर Homepage वरील " **R & D** " या विभागावर Click केल्यानंतर "Affiliation" वर pointer ठेवून त्यासमोर येणा-या "Online Affiliation" या Link वर click करुन संलग्नीत महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांना पुरविण्यांत आलेला login ID व password टाकल्यानंतर "**महाविद्यालयाची माहिती**" या चौकटीस click करावे व त्यानंतर पुन:श्च पासवर्ड टाकल्यानंतर पुढीलप्रमाणे ०६ links आपणांस दिसतील.

1) College Information
2) College Details Part:1
3)College Details Part:2
4) सध्या सुरु असलेले अभ्यासक्रम
5) अभ्यासक्रमनिहाय विषय
6) अभ्यासक्रमनिहाय तुकड्या

वरील प्रत्येक लिंकमध्ये आपल्या महाविद्यालयाने/मान्यताप्राप्त परिसंस्थेने यापूर्वी माहिती भरलेली आहे, तथापि, सदरची माहिती गांभीर्याने अचुक तपासून त्यात काही बदल/दुरुस्ती असल्यास, त्याप्रमाणे बदल/दुरुस्ती करुन प्रत्येक लिंक मधील माहिती अद्ययावत करावी. **ऑनलाईन प्रणालीव्दारे यापूर्वी भरलेला संपूर्ण डेटा आपणांस ऑनलाईन स्क्रिनवर उपलब्ध असून त्यातील माहिती अद्ययावत करणेसाठी आपणांस त्या-त्या स्क्रिनवरील त्या-त्या विंडोसमोर Edit/Delete ची सोय उपलब्ध करुन देण्यांत आलेली असून आपणास प्रत्येक Link मधील माहिती त्याप्रमाणे अद्ययावत करता येईल.**

वरील ०६ लिंक पैकी लिंक क्रमांक ०१ ते ०३ मध्ये महाविद्यालयीन माहिती असून त्यात आवश्यक असणारे बदल/दुरुस्ती करणे आवश्यक आहे; तसेच लिंक क्र.०४ ते ०६ संदर्भात अद्ययावत करावयाच्या बाबींसंदर्भातील माहिती थोडक्यात पुढीलप्रमाणे देत आहोत.

**लिंक क्र.०४:- सध्या सुरु असलेले अभ्यासक्रम**:- या लिंकमध्ये विद्याशाखा, अभ्यासक्रम, संलग्नीकरणाचा प्रकार, अभ्यासक्रमास असलेले संलग्नीकरणाच्या मान्यतेचे पत्र क्रमांक व दिनांक इत्यादि माहितीचा अंतर्भाव आहे. सदर माहिती अचुक अद्ययावत करुन त्यात आवश्यक त्या पत्राचा क्रमांक व दिनांक नमूद करावा.

**लिंक क्र.०५:- अभ्यासक्रमनिहाय विषय**:- ही लिंक फक्त **कला व विज्ञान** शाखेच्या अनुक्रमे बी.ए. व बी.एससी. या अभ्यासक्रमांकरिता तयार करण्यांत आली असून सदर लिंकमध्ये विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय, अभ्यासक्रमाचे वर्ष (प्रथम वर्ष, व्दितीय वर्ष, तृतीय वर्ष), विषयाचा प्रकार (सर्वसाधारण/अनिवार्य/विशेष), संलग्नीकरणाचा प्रकार, त्या विषयासाठी असलेल्या एकूण तुकड्या व असलेल्या तुकड्यांची एकुण प्रवेशक्षमता, सदर अभ्यासक्रमास विद्यापीठाच्या प्राप्त झालेल्या संलग्नता पत्राचा क्रमांक व दिनांक इत्यादि माहितीचा अंतर्भाव आहे. या लिंकमध्ये वरील अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर अभ्यासक्रम दिसणार नाहीत. तसेच या लिंकमधील प्रवेशक्षमता साधारणत: संगणक, बायोकेमिस्ट्री, मायक्रोबायोलॉजी, बायोटेक्नॉलॉजी, माहिती तंत्रज्ञान इत्यादि विषयांसाठी लागू असून ज्या विषयांना प्रवेशक्षमता मंजूर करण्यांत आली आहे अशाच विषयांची प्रवेशक्षमता यात भरावी, त्यात इतर विषयांसाठी प्रवेशक्षमता भरण्याची आवश्यकता नाही, तथापि त्या विषयांची संपूर्ण माहिती भरणे अनिवार्य आहे.

<u>**लिंक क्र.०६:- अभ्यासक्रमनिहाय तुकड्या**</u>:- या लिंकमध्ये **विद्याशाखानिहाय** पदवी व पदव्युत्तर वर्गाचे सर्व अभ्यासक्रम, अभ्यासक्रमाचे वर्ष, अभ्यासक्रमाच्या संबंधित वर्षासाठी मंजूर झालेल्या एकूण तुकड्या इत्यादि माहितीचा अंतर्भाव आहे. सदर लिंकमधील माहिती भरल्यानंतर तयार होणार असलेल्या तक्त्यात **"Add Batch details"** या रकान्यातील **+ या चिन्हावर** click करुन, तुकडीच्या मान्यतेचे वर्ष २०१८-१९ असे करणे अत्यावश्यक आहे. <u>त्यासाठी Edit बटनावर click करुन तुकडीच्या मान्यतेचे वर्ष २०१८-१९ असे करुन प्रत्येक तुकडीबाबत तुकडीची प्रवेशक्षमता, तुकडीचा अनुदान प्रकार, संलग्नतेचा प्रकार व संलग्नता प्राप्त झालेल्या पत्राचा क्रमांक व दिनांक इत्यादि माहिती अचूकपणे नमूद करावी. सदरचे वर्ष, पत्र क्रमांक व दिनांक अचूकपणे नमूद न केल्यास शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता संलग्नीकरणाच्या नुतनीकरणासाठीच्या ऑनलाईन प्रस्तावात सदर माहिती दिसणार नाही व पर्यायाने प्रस्ताव स्विकारता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.</u>

वर नमूद केल्यानुसार आपल्या महाविद्यालयाच्या login id मध्ये उपलब्ध करुन दिलेल्या वरील लिंकमधील माहिती <u>**दिनांक १७/०९/२०१८ ते २१/०९/२०१८ या कालावधीत**</u> परिपूर्ण भरावी, ही विनंती. <u>**उपरोक्त प्रत्येक लिंकमधील संपूर्ण माहिती भरुन ती अद्ययावत केल्याशिवाय शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिताचे संलग्नीकरणाचे नुतनीकरण/ नैसर्गिक विस्तार/कायम संलग्नीकरण व विस्ताराचे कोणतेही प्रस्ताव महाविद्यालयास सादर करता येऊ शकणार नाहीत**</u>, ही तांत्रिक बाब लक्षात घेता, वरील लिंक्स अद्ययावत स्वरुपात असणे अत्यंत गरजेचे आहे. आपणांस सदर लिंकमधील माहिती भरतांना काही अडचण आल्यास **7722065281/82** या Helpline वर विद्यापीठाच्या कार्यालयीन दिवशी सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.०० या वेळेत संपर्क साधावा, तसेच support@oaasisnmu.org या मेल आयडीवर महाविद्यालयाचा Login I.D. नमूद करुन आपणांस येणा-या अडचणी थोडक्यात नमूद कराव्यात, जेणेकरुन आपल्या अडचणींचे त्वरीत निराकरण करणे शक्य होईल. मात्र <u>*उपरोक्त लिंक्स दिनांक २१ सप्टेंबर, २०१८ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता बंद होतील,*</u> याची कृपया नोंद घेऊन उपरोक्त माहिती विहीत मुदतीत संगणकीय प्रणालीव्दारे ऑनलाईन पध्दतीने अद्ययावत करावी.

वरीलबाबत सर्वात महत्वाचे असे की, आपण ऑनलाईन प्रणालीमार्फत भरलेली/अद्ययावत केलेली संपूर्ण माहिती view/print या लिंकव्दारे पडताळून पहावी व ती बिनचुक केल्याची खातरजमा झाल्यानंतरच सदरची माहिती submit to University या लिंकव्दारे send करावी, अन्यथा आपण सादर केलेल्या माहितीमध्ये चुकून काही त्रुट्या राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती. अद्ययावत केलेली माहिती Submit to University केल्यानंतर आपणांस हवी असलेली Link (उदा. नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार, विस्तार, कायम संलग्नीकरण इ. ) तात्काळ Activate होईल व सदर Link व्दारे आपण आपले प्रस्ताव भरावयाचे आहेत.

कळावे,

आपला विश्वासू,

**Sd/-**

उपकुलसचिव(संलग्नता)
शैक्षणिक विभाग
क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव